# पंढरपूर सिंहगड महाविद्यालयाचा प्रथम वर्षाचा निकाल ८० टक्के

**लक्ष्मी दहिवडी (वार्ताहर) :** २०१५-१६ मध्ये सोलापूर विद्यापीठाच्यावतीने घेण्यात अभियांत्रिकी परीक्षेत कोर्टी ( ता.पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयांने घवघवीत यश संपादन केले असून चालू शैक्षणिक वर्षाचा निकाल ८० % लागला असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील कुमारी दिव्या प्रदिप कुलकर्णी या विद्यार्थीनीला १० पैकी १० सी. जी. पी. ए. प्राप्त झाला असुन सारीखा खुणे, सचिता जाधव, दिपाली उदगावे या विद्यार्थ्यांना ९.८२ तर महाविद्यालयातील पंधरा विद्यार्थ्यां ९.७० सी. जी. पी. ए. पेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे , विभाग प्रमुख डॉ. संध्या नलगे , प्रा. अनिल निकम आदी सह महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

# पंढरपुर सिंहगडच्या पाच विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी रशिया,बल्गेरिय येथे निवड












लक्ष्मी दहिवडी (प्रमोद बनसोडे):- सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोर्टी-पंढरपुर महाविद्यालयातील पाच विद्यार्थी रशिया व बल्गेरिया येथील विद्यापीठात प्रगत तांत्रिक प्रशिक्षणासाठी सी. टी. आय. एफ. विश्वनिकेतन नेटवर्कच्या माध्यमातून निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या मितेश काशावेणी , कॉम्प्युटर ॲण्ड सायन्स विभागातील तिसऱ्या वर्षीतील रणजीत स्वामी व इलेक्ट्रीकल विभागातील तिसऱ्या वर्षातील अक्षय क्षीरसागर या विद्यार्थ्यांची टेक्निकट युनिव्हर्सिटी ऑफ सोफीया बल्गेरिया येथे निवड झाली असुन याच महाविद्यालयतीला युरल फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ रशिया येथे मेकॅनिकल विभागातील चौथ्या वर्षात शिकत असलेल्या अंकीत फत्तेपुरकर व सिव्हील विभागातील मनाली जाधव या पाच विद्यार्थ्यांची सी.टी.आय.एफ. विश्वनिकेतन नेटवर्कच्या माध्यमातून प्रगत तांत्रिक प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयातुन निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ.कैलाश करांडे , डॉ.राजश्री बाडगे, सिव्हील विभागात प्रमुख डॉ. चेतन पिसे, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा.रविंद्र व्यवहारे, इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख श्रीनिवास गंजेवार आदि सह महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी अभिनंदन केले.

# सिंहगडच्या २६९ विद्यार्थ्यांची प्लेसमेंटद्वारे कंपनीत निवड

**लक्ष्मी दहिवडी (वार्ताहर) :** सिंहगड महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्षात २६९ विद्यार्थ्यांची जगातील नामवंत कंपनीत निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या मेकॅनिकल विभागातील १४०, कम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनियरींग विभागातील ४४, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन ४८, इलेक्ट्रीकल विभागातील २२ आणि सिव्हील विभागातील १५ अशा एकूण २६९ विद्यार्थ्यांची निवड झाली. महाविद्यालयातील विविध शाखेतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, डॉ. चेतन पिसे, डॉ. राजश्री बाडगे सर्व विभाग प्रमुख प्रा.रविंद्र व्यवहारे, प्रा.अभिजित राजगुरु, प्रा.अमोल जगदाळे, प्रा.श्रीनिवास गंजेवार, प्रा. अनिल निकम आदींनी अभिनंदन केले.